# मनभावन हा श्रावण

श्रावण, मराठी महिन्यातील पाचवा महिना. पावसाळा या ऋतूतील महत्वाचा महिना. आषाढ महिन्यात जेवढी धुवांधार पावसाची बरसात होते त्या मानाने श्रावणातील पाऊस हा लाजाळू मुलीसारखा, अंग चोरून जणू लाजत येणारा. हळूच पावसाची सर येणे आणि चक्क कधी सरते कळतच नाही. जणू एखादी लाजरी मुलगी, 'ती येते आणिक जाते'. त्यानंतर छानसे ऊन पडणार.

श्रावण म्हटला की प्रथम बालकवींची कविता आठवते.
'श्रावण मासी हर्ष मानसी ।
हिरवळ दाटे चोहीकडे ।
क्षणात येते सरसर शिरवे ।
क्षणात फिरुनी ऊन पडे ।'
बालकवींनी केलेल्या यथार्थ वर्णनाप्रमाणे श्रावणातला पाऊस असाच. एक मोठी सर येणार आणि थोड्यावेळात पाऊस जाऊन ऊन पडणार परंतु हे ऊन इतकं कोवळं असते की अगदी हवंहवंसं वाटत.

मंगेश पाडगावकर लिहितात तसे,
'श्रावणात घन निळा बरसला ।
रिमझिम रेशीम धारा ।'
रस्ते पावसाने ओले झालेले आणि सभोवताली परिसर ओला झालेला आणि त्यात ते कोवळं ऊन पडतं, अश्यावेळी इतकं सुखद वाटतं, त्यात आकाशात लांब नजर टाकली की इंद्रधनुष्याची कमान जणू स्वागतास सज्ज असते. हयाच कमानीला बालकवी जणू मंगल तोरणाची उपमा देतात.
'वरती बघता इंद्रधनुचा ।
गोफ दुहेरी विणलासे ।
मंगल तोरण काय बांधले ।
नभो मंडपी कुणी भासे ।'
बालकवी त्या इंद्रधनूला 'मंगल तोरणाची' उपमा देतात.

तसेच श्रावणातील इंद्रधनुष्याला शांताबाई शेळके किती छान उपमा देतात.
'नभी उमटे इंद्रधनू ।
मदनाचे चाप जणू ।
गगनाशी धरणीचा ।
जुळवीतसे सहज दुवा ।'

काय सुंदर वर्णन आहे आणि हा प्रत्यय श्रावणात येतो, जणू प्रेमीजनांचे भाव ह्या काव्यपंक्तीत प्रकट होतात.

श्रावण महिना आणि मोरांचे अतूट नाते असावे. निसर्ग बहरला असताना, मोर सुद्धा इतका आनंदी होऊन पिसारा फुलवत नाचू लागतो. निसर्ग इतका बहरलेला असतो जणू  झाडांच्या पानाला नवी लकाकी येते.

'श्रावणात घन निळा बरसला
रिमझिम रेशिमधारा । उलगडला झाडातून अवचित
फुलला मोर पिसारा ।'

श्रावणात ऊन पावसाचा पाठशिवणीचा खेळ सुरू असताना, ती कोवळी उन्हं, इतकी आल्हादयायी असतात आणि हिरवा निसर्ग जणू पाचू सारखा दिसू लागतो.

'पाचूच्या हिरव्या माहेरी ।
ऊन हळदीचे आले ।
माझ्या भाळा वर थेंबांचे ।फुलपाखरू झाले ।
मातीच्या गंधाने भरला ।
धरणीचा गाभारा ।'
अशी सुंदर काव्याकल्पना कवी पाडगावकरांना सुचते.

श्रावण हा निसर्गरम्य वातावरणाचा महिना तसाच श्रावण हा मांगल्याचा महिना. चातुर्मासात जी व्रतवैकल्य केली जातात त्यातील ती बहुतांशी श्रावण महिन्यात.

श्रावणातल्या सोमवाराचे एक वेगळेच वैशिष्ट्य. घरातील लहानथोर सगळे श्रावणी सोमवार पाळतात म्हणजे उपवास करतात. नाशिकला श्रावणात कपालेश्वराची पालखी निघते तसेच त्रिंबकेश्वरी त्रिंबकराजची पालखी निघते, ती पालखी गेल्यानंतर श्रावणी सोमवारचा उपवास सोडायची अद्याप प्रथा आहे, किंबहुना ही प्रथा अनेक गावात पाळली जात असावी. श्रावणाचे आणि शंकराचे दृढ नाते आहे. श्रावणात शंकराला अभिषेक असो वा शिवामूठ वाहणे, शिवलीलामृताचे वाचन, कहाणीचे वाचन इ. अव्याहत चालू असलेल्या रीती आहेत. श्रावण हा व्रतवैकल्याचा भाग तसेच निसर्गप्रति कृतज्ञता दर्शवणारे सणांचा महिना. नागपंचमीला असलेली नागाची पूजा, नागपंचमीची कहाणी. अगदी काही ठिकाणी आजही नागपंचमीला घरात भाज्या चिरत नाही, तव्यावर स्वयंपाक केला जात नाही. पिठोरी अमावस्या अथवा बैल पोळ्याला, शेतातील मुख्य कामे करणाऱ्या बैलाप्रति असलेला कृतज्ञ भाव प्रकट केला जातो. श्रावणातील व्रत वैकल्यात निसर्गात भाजीपाला मुबलक असतो. रानभाज्या जश्या श्रावणात चविष्ट लागतात तसेच अळू, लाल भोपळा, श्रावण घेवडा ह्या भाज्यांना एक वेगळीच चव

असते.

श्रावण महिना आणि माहेरवाशीण यांचे घट्ट नाते आहे. श्रावण महिन्यात माहेरवाशीण माहेरी जाण्यासाठी जणू आसुसलेली असते. श्रावणातील मंगळवारी असलेल्या मंगळागौरीच्या व्रताचे हे खास वैशिष्ट्य. नवविवाहित, नववधुंची ही मंगळागौर असली तरी त्यात आबालवृद्धा, सगळ्या घरातल्या आणि आप्त स्वकीय स्त्रिया सहभागी होत असतात. मंगळागौरीची यथासांग पूजेसोबत रात्रीचे जागरण आणि त्यावेळी रंगणारे विविध खेळ ही ह्या माहेरवाशीण स्त्रियांना एक मेजवानीच असते. गावात झाडाच्या फांदीला झोका बांधून त्यावर लांबच लांब झोका घेण्याची मजा घरातील लहान मुलींपासून अगदी माहेरवाशिणीसुद्धा घेतात. श्रावण आणि झोका ह्याचे वेगळेच नातं आहे. 'सावन के झुले' आनंदाने अनुभवताना जणू ह्या माहेरवाशीणींना त्याचे गत बालपण अनुभवल्याचा प्रत्यय येत असावा.

श्रावण हा भाऊ बहिणीच्या घट्ट नात्याचा 'रक्षाबंधन' ह्या सणांचा महिना, ज्यावेळी बहीण भावाला राखी बांधण्यासाठी आसुसलेली असते आणि त्या निमित्ताने तिला हक्काचं माहेरवास अनुभवता येतो. जशी राखी पौर्णिमा तशीच कोळी बांधवांची 'नारळी पौर्णिमा'. समुद्राला मानाचं नारळ अर्पण करून नवीन मासेमारीला सुरुवात करायचा हा जणू मुहूर्त.
श्रावणात जणू प्रत्येक वारी एक खास व्रतवैकल्य असावे. बुधवार हा बृहस्पतीचा तर शुक्रवार जीवतीच्या सवाष्णीचा. श्रावणी शनिवार हा एक उपवासाचा खास दिवस आणि रविवारी कित्येक ठिकाणी आदित्य राणुबाई आणि सूर्य देवतेची पूजा असते. हे आदित्य राणुबाईचे व्रतच आहे. त्याशिवाय श्रावणातील सत्यनारायणाच्या पूजेचे वेगळेच महत्व आहे. आपला राष्ट्रीय सण म्हणजेच स्वतंत्र दिन, १५ ऑगस्ट हा साधारणतः श्रावण महिन्यातच येतो.

श्रावण महिना हा व्रत वैकल्य आणि सणासुदीच्या धामधुमीच्या असतो तसाच तो प्रेमीजनांच्या अव्यक्त भावना व्यक्त करण्याचा महिना असतो. बहरलेल्या निसर्गाने प्रेमी युगुलांचे प्रेम बहरत जाते. ऊन पावसाच्या पाठशिवणीच्या खेळात तन आणि मन जणू ओलेचिंब होत असावे. त्याच भावना शांताबाई शेळके हळुवारपणे मांडतात.
'मनभावन हा श्रावण ।
भिजवी तन भिजवी मन हा श्रावण ।
थरथरत्या अधरावर प्रणयी संकेत नवा ।
ऋतू हिरवा ऋतू बरवा ।'

**- मनोज कुरुंभटी**